# मराठी विज्ञान परिषद

**मराठी विज्ञान परिषद, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई 400022.**

**दूरध्वनी (022) - 2405 4714 / 2405 7268.**

**Email :** office@mavipamumbai.org **Website :** www.mavipamumbai.org


## मराठी विज्ञान परिषदेचा भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पुरस्कार

एखाद्या देशाची सुबत्ता वाढते, लोकांचे जीवनमान सुधारते, त्या देशात संपत्ती मोठ्या प्रमाणावर निर्माण होते, तेव्हा तिथे कोणते घटक कार्यरत असतात? अनेक गोष्टींचा उल्लेख करता येईल; आणि त्या सर्व महत्त्वाच्या आहेतच. पण जगातील श्रीमंत राष्ट्रांकडे एक धावती नजर टाकली, तरी लक्षात येईल, की यातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे 'विज्ञान आणि तंत्रज्ञान'. त्यातली प्रगती, त्यातले संशोधन, नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या आधारावर निर्माण झालेली तंत्रशास्त्रे आणि एकूणच समाजावर असलेला वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रभाव. आपल्या देशालाही सुबत्ता हवी असेल, सर्व-सामन्यांचे जीवनमान सुधारायचे असेल, आत्महत्यांच्या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांची सुटका करायची असेल, तर मार्ग विज्ञान-तंत्रज्ञान हाच असू शकतो. खरे तर, त्यासाठी आवश्यक बुद्धिमत्ता आपल्याकडे आहे. हुशार विद्यार्थी आहेत. उच्च दर्जाचे संशोधन कौशल्य आहे. चांगल्या प्रयोगशाळा आहेत, विद्यापीठे आहेत. पण विज्ञान-तंत्रज्ञान यांच्या आधारे संपत्ती निर्मिती करण्यातले आपले यश फार मर्यादित आहे.

याचे एक कारण कदाचित हे आहे, की इथल्या विज्ञान संशोधनाची नाळ इथल्या समाजाशी जुळलीच नाही. संशोधनासाठी घेतलेले प्रश्न एका पातळीवरचे असतात आणि समाजाचे प्रश्न असतात दुसऱ्याच पातळीवर. अशा संशोधनातून तंत्रज्ञान निर्माण होणार कसे आणि संपत्ती निर्माण होणार कशी? पण या परिस्थितीतही काही तंत्रज्ञाने लोकांपर्यंत पोहोचवणारे उत्साही कार्यकर्ते आहेत. त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. अशांपैकी एका यशस्वी अभियंत्याच्या नावे पुरस्कार देऊन गौरव करण्याचे मराठी विज्ञान परिषदेने ठरविले आहे व ते दरवर्षीच्या १५ सप्टेंबर या राष्ट्रीय अभियंतादिनी देणे उचित ठरेल.

मराठी विज्ञान परिषदेस मिळालेल्या रु. २ लाखांच्या देणग्यांमधून परिषद दरवर्षी १५ सप्टेंबर या राष्ट्रीय अभियंतादिनी रु. १०,०००/- चा एक पुरस्कार वर्ष २०१८ ते वर्ष २०२७ अशी दहा वर्षे देणार आहे.

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या (१५ सप्टेंबर, १८६१ ते १२ एप्रिल, १९६२) हे श्रेष्ठ अभियंता होते. जन्म कर्नाटकातला, मुळचे तेलुगु – आंध्र प्रदेशातील कुर्नूल भागातील मोक्षगुंडम गावचे. प्राथमिक शिक्षण कर्नाटकातील चिक्क-बल्लापूर या खेड्यात आणि पुढे १८८०मध्ये बंगळुरुच्या सेंट्रल कॉलेजमधून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत परंतु विशेष गुणवत्तेत बी.ए. उत्तीर्ण. बंगळुरुहून बी.ए. झाल्यावर पुण्याला आले आणि १८८३मध्ये कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून सिव्हील इंजिनिअर झाले. या परिक्षेत ते तत्कालीन मुंबई प्रांतात पहिले आले. त्यानंतर त्यांनी पहिली नोकरी तेव्हाच्या मुंबई राज्यातील नाशिक, खानदेश आणि पुणे येथे केली. पुण्याला ते खडकवासला धरणावर असताना १९०३मध्ये त्यांनी पावसाळ्यात धरणामध्ये जास्त पाणी आल्याने धरण असुरक्षित होऊ नये म्हणून निर्माण केलेल्या स्वयंचलित स्लुईस गेट्स अद्वितीय ठरल्या व त्यानंतर ग्वाल्हेरच्या टायग्रा आणि म्हैसूरच्या कृष्णराज सागर धरणावर त्या वापरल्या गेल्या. १९०६मध्ये त्यांनी एडनला पाणी व सांडपाण्याची व्यवस्था करून दिली. हैदराबाद शहराला पूरनियंत्रण योजना तर केलीच पण एरवी जाणवणाऱ्या पाण्याच्या तुटवड्यासाठी उस्मानसागर आणि हुसेनसागर या तलावांची निर्मिती करून दिली, जी आजही उपयोगी पडते. विशाखापट्टणम येथे समुद्राच्या लाटांमुळे होणारी धूप त्यांनी थांबवली. बिहारमध्ये गंगेवरील मोकामा पुलासाठी त्यांनी काम केले. पुढे ते म्हैसूरचे दिवाण झाल्यावर त्यांनी कावेरी नदीवर कृष्णराज सागर धरण बांधले, म्हैसूर सोप फॅक्टरी सुरू केली, म्हैसूर आयर्न अँड स्टील फॅक्टरी सुरू केली, पॅरॅसिटोल्ड लॅबोरेटरी, बंगळूरला जय चामराज पॉलिटेक्निक, कृषी विद्यापीठ, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, बँक ऑफ म्हैसूर, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स, कन्नड परिषद अशा संस्था सुरू केल्या. त्यांच्या प्रेरणेने हिदुस्तान एअर क्राफ्ट आणि प्रीमिअर ऑटोमोबाईल या कंपन्या वालचंद हिराचंद ह्यांनी सुरू केल्या. त्यांना १९५५मध्ये भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अशा या देश घडवणाऱ्या अभियंत्याच्या जन्मदिनी म्हणजे १५ सप्टेंबर या दिवशी दरवर्षी राष्ट्रीय अभियंता दिन साजरा केला जातो.

# मराठी विज्ञान परिषद

**मराठी विज्ञान परिषद, वि.ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई 400022.**
**दूरध्वनी (022) - 2405 4714 / 2405 7268.**
**Email :** office@mavipamumbai.org **Website :** www.mavipamumbai.org

**पुरस्काराचे नियम :**

1) हा पुरस्कार मराठी विज्ञान परिषद पुरस्कृत आहे.
2) पुरस्कार २०१८ ते २०२७ अशी दहा वर्षे दिला जाईल.
3) **हा पुरस्कार भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या ह्यांच्या नावे दिला जाईल**.
4) दरवर्षी अभियांत्रिकीतील एकेक शाखा घेऊन त्यात संशोधनात्मक समाजोपयोगी काम करणाऱ्या एका व्यक्तीस हा पुरस्कार दिला जाईल.
5) २०१८ या पहिल्या वर्षी स्थापत्य अभियांत्रिकी तर २०१९मध्ये रसायन अभियांत्रिकी ही शाखा निवडली होती, **वर्ष २०२०साठी यंत्र अभियांत्रिकी ही शाखा निवडली आहे**.
6) या पुरस्काराची प्रवेशिका १५ ऑगस्ट, २०२०पर्यंत मराठी विज्ञान परिषदेच्या संकेतस्थळावर दिलेल्या लिंकचा वापर करून ऑनलाईन भरावयाची आहे. संकेतस्थळ- **www.mavipamumbai.org** याकरिता उमेदवाराकडे कोणत्याही डोमेनचा वैध ई-मेल पत्ता असणे आवश्यक आहे.
7) पुरस्कार वितरण समारंभ दरवर्षी १५ सप्टेंबरला मुंबईतील एखाद्या अभियांत्रिकी महाविद्यालयात होईल. मात्र त्या दिवशी रविवार असला तर आदल्या दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी तो कार्यक्रम होईल. पुरस्कार वितरण समारंभात विजेत्याने ३० ते ४५ मिनिटे आपले काम पॉवर पॉईण्ट प्रेझेण्टेशनद्वारे सादर करणे आवश्यक आहे. बाहेरगावच्या व्यक्तीला वेगळा प्रवास खर्च दिला जाणार नाही.
8) **रु. १०,०००/-, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप राहील**.
9) आलेल्या प्रवेशिकांतून एका प्रवेशिकेची निवड मराठी विज्ञान परिषदेने नेमलेल्या समितीमार्फत केली जाईल व त्या समितीचा निर्णय अंतिम राहील.
10) प्रवेशिका मागवण्यासाठी मराठी विज्ञान परिषदेच्या वेब साईटवर **(www.mavipamumbai.org)** आणि मुंबईच्या मराठी वर्तमानपत्रात दरवर्षी जून-जुलै-ऑगस्ट महिन्यात निवेदन प्रसिद्ध केले जाईल.
11) **मविपच्या संकेतस्थळावर दिलेल्या लिंकचा वापर करून परिषदेकडे पाठविलेल्या माहितीमध्ये आपले पूर्ण नाव, जन्म दिनांक, शिक्षण, कुठे काम करता ते, ई-मेल पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक आणि कामाचे विस्तृत सचित्र वर्णन असणे आवश्यक आहे**.
12) **पुरस्कार त्या-त्या वर्षीच्या १५ सप्टेंबरला चाळीस अथवा त्यापेक्षा कमी वय असणाऱ्या व्यक्तीला मिळेल**.
13) वरील अट गरजेनुसार शिथिल करण्याचे अधिकार मराठी विज्ञान परिषदेकडे राहतील.

अ. पां. देशपांडे
कार्यवाह,
मराठी विज्ञान परिषद